R.No.MAHMAR/25/A3029

# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक ११० शनिवार दि.०८ नोव्हेंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## देशभरातील SIR विरुद्धच्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात 'या' दिवशी होणार सुनावणी




नवडणूक आयोगाच्या देशभरात ङखठ प्रक्रिया राबवण्याच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर ११ नोव्हेंबर रोजी सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने सहमती दर्शवली आहे. वरिष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी SIR प्रक्रियेला आव्हान देणाऱ्या पश्चिम बंगाल सरकारच्या नवीन याचिकेवर सुनावणी घेण्याचा निर्णय न्यायमूर्ती सूर्यकांत आणि जयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने घेतला आहे.

असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (-DR) या याचिकाकर्त्यांचे प्रतिनिधित्व करणारे वकील प्रशांत भूषण आणि नेहा राठी यांनी म्हटले आहे की, हा मुद्दा भारताच्या लोकशाहीच्या मुळांना स्पर्श करतो. त्यांनी म्हटले आहे की,निवडणूक आयोगाने आधार कार्डांना मान्यता देण्यास नकार दिल्याने निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होते. प्रशांत भूषण यांनी असेही निदर्शनास आणून दिले की. SIR प्रक्रिया आता इतर राज्यांमध्ये विस्तारित केली जात आहे, ज्यामुळे निवडणूक आयोगाच्या स्वतःच्या लोकशाही प्रक्रियेला धक्का बसत आहे. पुढे ते म्हणाले, भारताच्या लोकशाहीच्या पायाशी संबंधित ही एक अतिशय महत्त्वाची बाब आहे.

बिहार SIR वर आधीच सुनावणी सुरू खंडपीठाने म्हटले आहे की,११ नोव्हेंबरपासून अनेक महत्त्वाची प्रकरणे सूचीबद्ध असली तरी, SIR प्रकरणांना सामावून घेण्यासाठी ते इतर प्रकरणांची सुनावणी समायोजित करण्याचा प्रयत्न करेल. भूषण म्हणाले की, विविध राज्यांमध्ये एसआयआर प्रक्रिया आधीच सुरू झाली आहे, त्यामुळे या प्रकरणाची तातडीने सुनावणी आवश्यक आहे. बिहारमध्ये विशेष सखोल पुनर्विलोकन करण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालय आधीच सुनावणी करत आहे. बिहारमधील SIR प्रक्रियेचे वर्णन करताना, निवडणूक आयोगाने १६ ऑक्टोबर रोजी सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की, याचिकाकर्ते, राजकीय पक्ष आणि स्वयंसेवी संस्था केवळ प्रक्रियेला बदनाम करण्यासाठी खोटे आरोप करण्यात समाधानी आहेत. निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयाला असेही सांगितले की,अंतिम मतदार यादी प्रकाशित झाल्यापासून एकाही मतदाराने नावे वगळण्याविरुद्ध अपील दाखल केलेले नाही.

## कर्तव्यदक्ष अधिकारी डॉ. पंजाबराव खानसोळे - 'सुंदर लातूर, स्वच्छ लातूर'च्या वाटचालीचे आधारस्तंभ



लातूर शहर महानगरपालिकेचे उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे हे आपल्या कार्यतत्परतेसाठी, शिस्तप्रियतेसाठी आणि जनसहभागातून शहराच्या विकासासाठी ओळखले जातात. त्यांनी गेल्या काही वर्षांत स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, बांधकाम, अतिक्रमण,अग्निशमन, आस्थापना, मालमत्ता आणि वसुली, रमाई व पंतप्रधान आवास योजना अशा महत्त्वाच्या विभागांची जबाबदारी अत्यंत प्रभावीपणे पार पाडली आहे. शहराच्या वसुलीमध्ये त्यांनी केलेली कामगिरी उल्लेखनीय ठरली असून, महानगरपालिकेच्या इतिहासातील सर्वाधिक वसुली त्यांच्या कार्यकाळात झाली. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर देणे शक्य झाले, ही त्यांच्या कार्यक्षमतेची साक्ष आहे. डॉ. खानसोळे यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता पारदर्शक आणि शिस्तप्रिय प्रशासनाची परंपरा जोपासली. आयुक्तांनंतर जवळपास सर्व विभागांची जबाबदारी त्यांनी खांद्यावर घेतली आणि प्रत्येक कामात पारदर्शकता राखली. सुंदर लातूर - स्वच्छ लातूर हे स्वप्न साकार करण्यासाठी डॉ. खानसोळे स्वतः पहाटे शहरात फिरून नागरिकांशी संवाद साधतात. कचरा फक्त घंटागाडीतच टाकावा यासाठी त्यांनी जनजागृती केली असून, अनेक ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन स्वच्छतेचे निरीक्षण केले. शहरात स्वच्छता संस्कृती रुजविण्यासाठी त्यांनी कर्मचाऱ्यांसोबत खांद्याला खांदा लावून काम केले. निवडणूक विभागातील प्रभाग रचना, अतिवृष्टीतील बचावकार्य, तसेच अनुकंपा धोरणानुसार स्वच्छता विभागातील कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देणे ही त्यांची कार्यशैली किती सर्वसमावेशक आहे याची उदाहरणे आहेत. अनेक उपायुक्त आले आणि गेले, पण लातूर मनपाच्या कार्यपद्धतीत सातत्य, शिस्त आणि जनसेवा निर्माण करणारे अधिकारी म्हणजे डॉ. पंजाबराव खानसोळे, असे सर्वत्र म्हटले जाते. आता नव्या उपायुक्त वसुधा फड रुजू झाल्याने, मनपाच्या कामकाजात अधिक बळ आणि कार्यक्षमता येईल, असा विश्वास अधिकारी व कर्मचारी व्यक्त करत आहेत. वसुधा फड या देखील कर्तव्यदक्ष, पारदर्शक आणि शिस्तप्रिय अधिकारी म्हणून ओळखल्या जातात.

## उपायुक्त पदावर वसुधा फड पुन्हा लातूर मनपात रुजू



लातूर/ प्रतिनिधी: लातूर शहर महानगरपालिकेच्या उपायुक्त म्हणून वसुधा फड गुरुवारी (दि. ६ ) रुजू झाल्या. विशेष म्हणजे यापूर्वीही सहाय्यक आयुक्त म्हणून त्यांनी लातूर येथे काम केलेले आहे.आता पदोन्नतीने त्या लातूर येथे आल्या आहेत.

एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळख असलेल्या वसुधा फड यांची २०१० मध्ये एमपीएससी मार्फत मुख्याधिकारी संवर्गातून निवड झालेली आहे. त्यांनी यापूर्वी नांदेड पालिकेत सहाय्यक आयुक्त, लातूर पालिकेत सहाय्यक आयुक्त, औसा नगरपालिकेत मुख्याधिकारी, गंगाखेड नगरपालिकेत मुख्याधिकारी आणि धाराशिव येथे मुख्याधिकारी म्हणून काम केलेले आहे. आता पदोन्नतीने त्या उपायुक्त म्हणून लातूर येथे रुजू झाल्या आहेत.

गुरुवारी (दि. ६) त्यांनी पदभार स्वीकारला. यावेळी अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, सहाय्यक आयुक्त खदीर शेख, पर्यावरण अधिकारी, सन्मती मेस्त्री, स्वच्छता विभाग प्रमुख, रमाकांत पिडगे,मालमत्ता व्यवस्थापक, शुभम बावने,शिक्षणाधिकारी श्वेता नागणे यांच्यासह सर्व विभाग प्रमुखांनी त्यांचे स्वागत केले.

यावेळी सत्काराला उत्तर देताना वसुधा फड यांनी पालिका आयुक्त श्रीमती मानसी मॅडम यांच्या मार्गदर्शनात उपायुक्त पदाच्या माध्यमातून लातूर शहरातील जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी कार्यरत राहण्याची ग्वाही दिली. लातूर शहराची माहिती असणाऱ्या अधिकारी उपायुक्त म्हणून रुजू झाल्याच्या भावना अधिकारी व विभाग प्रमुखांनी यावेळी व्यक्त केल्या.

## विलास साखर कारखान्याच्या गळीत हंगामाचे बॉयलर अग्निप्रदिपन संपन्न; ८ लाख मे. टन गाळपाचे उद्दिष्ट






लातूर / प्रतिनिधी :- या वर्षी कार्यक्षेत्रात ऊसाची उपलब्धता मोठया प्रमाणात आहे. या अनुषंघाने गळीत हंगामात उच्चांकी ऊसाचे गाळप आणि ऊच्चांकी साखर ऊतारा मिळवण्यासाठी साखर कारखाना प्रशासनाने सज्ञ रहावे, असे आवाहन कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशाली विलासराव देशमुख यांनी केले. विलास सहकारी साखर कारखाना लि., वैशालीनगर, निवळी कारखान्याच्या गळीत हंगाम सन २०२५-२६ चे बॉयलर अग्निप्रदिपन शुक्रवार, ७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशाली विलासराव देशमुख यांच्या हस्ते सर्व संचालकांच्या उपस्थितीत करण्यात आले यावेळी त्या बोलत होत्या. यावर्षी मृगासह परतीचा पाऊस चांगला झाला आहे. यामुळे कारखाना कार्यक्षेत्रासह जिल्हयात ऊसाचे क्षेत्र वाढले आहे. कार्यक्षेत्रातील ऊसाचे क्षेत्र पाहता कारखाना हंगाम यशस्वीपणे पार पडण्यासाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे. सुरु होत असलेल्या गळीत हंगामातील ८ लाख मे. टन ऊसाचे गाळप उदिष्टय साध्य करण्यासाठी कारखाना सज्ञ केला असून गळीत हंगामात कारखाना पूर्ण क्षमतेने चालावा, हंगाम सुरु असतांना तांत्रीक कारणाने कारखाना बंद राहणार नाही यासाठी हंगाम बंद काळातील कामे चांगल्या प्रकारे करण्यात आली आहेत. कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशाली विलासराव देशमुख यांच्या हस्ते सर्व संचालकांच्या उपस्थितीत बॉयलर अग्निप्रदिपन कार्यक्रम प्रसंगी लोकनेते विलासराव देशमुख यांच्या पुतळयास अभिवादन करण्यात आले. तसेच नवीन हार्वेस्टरचे पूजनही यावेळी करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर विलास कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशाली विलासराव देशमुख, व्हा. चेअरमन वैजनाथराव शिंदे, ट्रवेन्टीवन शुगर्सचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील, कार्यकारी संचालक आत्माराम पवार, संचालक सर्वश्री रविंद्र काळे, अमृत जाधव, सतिश शिंदे (पाटील), अनंत बारबोले, नरसिंग बुलबुले, नितीन पाटील, रंजीत पाटील, रसुल पटेल, तात्यासाहेब पालकर, हणमंत पवार, नेताजी साळुंके (देशमुख), रामराव साळुंके, दिपक बनसोडे, लताबाई देशमुख, शाम बरुरे, सुभाष माने व रमेश देशमुख उपस्थित होते. कार्यक्रम प्रसंगी चेअरमन श्रीमती वैशाली विलासराव देशमुख पूढे बोलतांना म्हणाल्या, विलास कारखानाची वाटचाल पाहून आदरणीय साहेबांच्या धोरणा प्रमाणे त्यांचे कार्य पूढे जात आहे हे पाहून आनंद होत आहे. आम्ही तुमचे आहोत आणि तुम्ही आमचे आहात आपली कोणतीही अडचण असल्यास तुम्ही हाक मारा, आम्ही आपल्या मदतीला धावून येऊ असे सांगीतले. यावेळी व्हा. चेअरमन वैजनाथराव शिंदे यांनी गळीत हंगाम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शुभेच्छा दिल्या. लातूर जिल्हयामध्ये सहकार आणि साखर उदयोग आपल्या नेतृत्वाने उभा केला या माध्यमातून आपला सर्वांचा विकास झाला आहे. यामध्ये साखर कारखान्याचे योगदान मोलाचे आहे. यामुळे येणाऱ्या हंगामात चांगले गाळप होण्यासाठी सर्वांनी योगदान दयावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील यांनी केले, यावेळी बोलतांना ते म्हणाले, गळीत हंगामाची जय्यत तयारी झाली आहे. कारखाना तांत्रीकदृष्टीने बंद राहणार नाही यांची काळजी घेऊन गाळप उदीष्टय पूर्ण केले जाईल. तसेच या वर्षीच्या हंगामात विक्रमी गाळपाचे आणि साखर उताराचे उदीष्टय साध्य करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली. प्रारंभी विलास साखर गणेशोत्सव मंडळाकडून कर्मचाऱ्यासाठी घेण्यात आलेल्या क्रिकेट स्पर्धा, रस्सीखेच स्पर्धातील विजेत्यांना आणि कर्मचाऱ्यांच्या गुणवंत पाल्यांना चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांच्या हस्ते पारीतोषिक देण्यात आले. तसेच बॉयलर अग्नी प्रदिपन प्रसंगी बॉयलर अटेडंन्ट पद्माकर चौगुले, हनमंत शेडगे, सुर्यकांत माळी, जानुमियॉ शेख, दत्ता शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. बॉयलर अग्निप्रदीपन प्रसंगीची महापूजा संचालक हणमंत पवार आणि सौ. व्दारका पवार यांच्य हस्ते करण्यात आली. सुत्रसंचालन राहूल इंगळे यांनी केले तर आभार संचालक शाम बरुरे यांनी मानले. कार्यक्रमास सर्व सभासद, ऊसउत्पादक, ठेकेदार, अधिकारी, कर्मचारी, कामगार मोठया संख्येने उपस्थित होते.

## वंदे मातरम देशाच्या एकतेचा आवाज - अजित पाटील कव्हेकर वंदे मातरमच्या जयघोषाने ट्युशन एरिया दुमदुमला






लातूर / प्रतिनिधी:- - वंदे मातरम गीतातून राष्ट्रीयत्वाची भावना आणि मातृभूमीचे प्रेम जागृत होते. हे गीत कोणत्याही धर्म आणि भाषेशी संबंधित नसून याचा धार्मिकतेशी संबंध लावण्याची चूक मागील काळात करण्यात आलेली आहे. त्यामुळे वंदे मातरम हे गीत दाबण्याचा प्रयत्नही त्यावेळी करण्यात आलेला होता. मात्र वंदे मातरम हे आपल्या देशाच्या एकतेचा आवाज असून याचा जयघोष आणि उद्घोष सातत्याने व्हावा असे आवाहन भाजपा लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले.

बकिमचंद्र चटोपाध्याय लिखित वंदे मातरम या राष्ट्रगाणला १५० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल लातूर शहर जिल्हा भाजपच्या वतीने व आर.सी.सी., आय.आय.बी., विद्याआराधना यांच्या सहकार्यातून ट्युशन एरिया येथे ७,००० पेक्षा अधिक विधार्थ्यांच्या उपस्थितीत सामुहिक वंदे मातरम गायन करण्यात आले. यावेळी अजित पाटील कव्हेकर बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, निवडणूक प्रमुख डॉ.अर्चना पाटील चाकूरकर, प्रा.शिवराज मोटेगावकर, प्रा.सतीश पवार, प्रा.निळकंठ मीरकले, संजय लड्डा, माजी शहर जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे, सरचिटणीस प्रवीण कस्तुरे, निखील गायकवाड, रागिणी यादव, संजय गिर, व्यंकटेश कुलकर्णी, महिला मोर्चा अध्यक्षा शीतल मालू, मंडल अध्यक्ष निर्मला कांबळे, सुरेश जाधव, राहुल भुतडा, काकासाहेब चौगुले, विशाल हावा पाटील, रोहित पाटील, सचिन सुरवसे, गोपाळ वांगे, राजकुमार गोजमगुंडे अनुसूचित मोर्चा अध्यक्ष पवन आल्टे, ओ.बी.सी. मोर्चा अध्यक्ष प्रमोद गुडे, सुरेश राठोड, श्रीकांत रांजणकर, प्रा.उदय देशपांडे, दिपक मठपती आदींची उपस्थिती होती.

१८७५ मध्ये बकिमचंद्र चटोपाध्याय यांनी आपल्या आनंद मठ या कादंबरीतून वंदे मातरम हे गीत निर्माण केले असल्याचे सांगून अजित पाटील कव्हेकर म्हणाले कि, वंदे मातरम या गीताने स्वातंत्र्य लढ्याची प्रेरणा अधिक जागृत करून क्रांतीकरांना व स्वातंत्र्यसेनानी यांना प्रेरित केले होते. त्यावेळी प्रत्येकाच्या हृदयात वंदे मातरम हे स्वातंत्र्य लढ्याच्या शक्तीचे स्त्रोत बनले होते. आजही प्रत्येक भारतीयांच्या अंतकरणात वंदे मातरम वसलेले असून हे राष्ट्र अभिमानाचे प्रतिक आहे. मात्र याच वंदे मातरम गीताचा संबंध धार्मिकतेशी जोडण्याची चूक त्यावेळी काँग्रेसने केली असल्याचे अजित पाटील कव्हेकर यांनी सांगितले. या कारणाने वंदे मातरमला दाबण्याचा प्रयत्नही सातत्याने त्यावेळी झालेला होता. मात्र वंदे मातरम हे राष्ट्रभक्तीचे आणि मातृभुमीप्रती प्रेम व्यक्त करण्याचे ऊर्जास्त्रोत असून याचा धार्मिकतेशी कोणताही संबंध नसल्याचे सांगितले आहे. आजही वंदे मातरम प्रत्येक भारतीयांच्या मनामनात आणि कणाकणात वसलेले असून वंदे मातरम हे गीत राष्ट्रीय एकतेचा आवाज असल्याचे सांगून याचा जयघोष आणि उद्घोष सातत्याने व्हावा असे आवाहन शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले.

यावेळी आसावरी जोशी यांच्यासमवेत ७,००० पेक्षा अधिक विद्यार्थी व उपस्थित भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते व नागरिकांनी सामुहीकरित्या वंदे मातरमचे गायन केले. यानंतर वंदे मातरमच्या जयघोषाने संपूर्ण ट्युशन एरिया दुमदुमला गेला. यावेळी प्रा.शिवराज मोटेगावकर, प्रा.सतीश पवार, प्रा.निळकंठ मीरकले, संजय लड्डा व आसावरी जोशी यांचे विशेष सहकार्य लाभल्या बद्दल शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी आभार व्यक्त केले. यावेळी माजी स्थायी समिती सभापती ॲड. दिपक मठपती, शोभा पाटील, श्वेता लोंढे, स्वाती घोरपडे, वर्षा कुलकर्णी, मीना भोसले, प्रवीण घोरपडे, शिरीष कुलकर्णी, शीतल पाटील, किशन बडगिरे, मोहसीन शेख, अमजद पठाण, अनिल पतंगे, विनय जाकते, श्रीराम कुलकर्णी, भरत भोसले, धनंजय हाके, गणेश गवारे, राजन सोनवणे, मधुसूदन पारीख, शामसुंदर मानधना, गणेश हेड्डा, संजय सूर्यवंशी, सीमा करपे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बिहारमध्ये दहशतीचे सरकार नको.! पंतप्रधान मोदींचा आरजेडीवर हल्ला

सध्या काँग्रेस पक्षालाही आरजेडीच्या आश्वासनांवर विश्वास नाही, म्हणूनच ते आरजेडीच्या जाहीरनाम्याचा उल्लेखही करत नाही. बिहारमधील जनता आणि तरुणांनीही आरजेडीच्या खोट्या गोष्टी नाकारल्या आहेत. पण काहीही झाले तरी बिहारमध्ये आता बंदुकीच्या धाकावरचे (कट्टा सरकार) सरकार नको आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. बिहारच्या औरंगाबादमध्ये प्रचारासाठी पोहोचलेल्या पंतप्रधानांनी एका जाहीर सभेला संबोधित केले.



बिहारमध्ये मतदानाचा पहिला टप्पा संपला आहे. दुसरा आणि शेवटचा टप्पा ११ नोव्हेंबर रोजी होणार आहे. दुसऱ्या टप्प्यासाठी निवडणूक प्रचार जोरात सुरू आहे. पंतप्रधान मोदींनी आरजेडीवर निशाणा साधत म्हटले की, जंगलराज करणारे आधीच मुलांना भ्रष्ट बनवण्याबद्दल बोलत आहेत आणि ते उघडपणे ते करत आहेत. हे लोक उघडपणे घोषणा करत आहेत की, जर भैय्याचे सरकार सत्तेत आले तर बंदुका, डबल बॅरल गन, खंडणी, खंडणी, हे सर्व चालू राहील. आता बिहारला वाईट प्रशासन असलेले सरकार नको आहे. राजदवर निशाणा साधत पंतप्रधान मोदी म्हणाले, हे लोक नोकऱ्यांच्या बदल्यात जमिनीची नोंदणी करून घ्यायचे. आम्ही बिहारमध्ये ६० लाख गरीब लोकांना कायमस्वरूपी घरे दिली. तुम्ही नितीश कुमार यांना येथे संधी दिली तेव्हा त्यांच्या कार्यकाळातील पहिली नऊ वर्षे दिल्लीत राजद आणि काँग्रेस सत्तेत होते हे लक्षात ठेवा. दिल्लीत बसलेल्या या लोकांनी दिवसरात्र काम केले. त्यांनी बिहारच्या विकासात सतत अडथळा आणला आणि नितीश कुमारांना काम करण्यापासून रोखले. २०१४ मध्ये, जेव्हा बिहारमध्ये पहिल्यांदाच डबल-इंजिन सरकार स्थापन झाले, तेव्हा आम्ही बिहारच्या विकासासाठी तिप्पट जास्त पैसे वाटप केले.

# संपादकीय

## वंदे मातरम् : प्रखर देशभक्तीचा आविष्कार

वंदे मातरम्' असे शब्द उच्चारताच प्रत्येक भारतीयाच्या रोमा–रोमात देशभक्तीचा संचार होतो. स्वातंत्र्यलढ्यात 'वंदे मातरम्' असे म्हणत कितीतरी सत्याग्रहींनी ब्रिटिश साम्राज्याची शृंखला तोडण्यासाठी कारागृहाचा मार्ग पत्करला. काळ्या पाण्याची शिक्षा अनुभवली, अनेकजण त्या वेदीवर हुतात्मा झाले. या सार्यांच्या मागे प्रेरणा होती ती 'वंदे मातरम्' या गीताची, या तेजस्वी मंत्राची. या गीताची महती कितीही वर्षे उलटली, तरी ती सदैव प्रत्येक भारतीयाच्या कानात घुमत राहील. हे मातृभूमी, तुझ्या प्रेरणेने मी नतमस्तक होतो, हे सूत्र घेऊन या गीताची बंकिमचंद्र चटर्जी यांनी 'आनंदमठ' या कादंबरीत रचना केली. त्यांचा प्रत्येक शब्द देशभक्तीच्या भावनेने ओथंबलेला होता आणि आपल्या पुण्यभूमी, पितृभूमी, मातृभूमी विषयी अपार कळवळा आणि प्रेम अभिव्यक्त करणारा होता. काव्य म्हणजे सहजपूर्त भावनांचा उत्कट आविष्कार असतो आणि हा आविष्कार थेट समाधी अवस्थेत प्रकट होतो, असे वर्डस्वर्थ या कवीने म्हटले आहे. काव्यातील अभिजात पुनःप्रत्ययाचा आनंद देणारा श्रेष्ठ रसास्वाद घेण्यासाठी हे सूत्र सदैव प्रेरक ठरते. सदैव नवी स्फूर्ती देते. तसेच काहीसे 'वंदे मातरम' या गीताचे सुद्धा आहे. १८७० मध्ये लिहिलेली आणि १८८२ मध्ये 'आनंदमठ' कादंबरीमध्ये समाविष्ट केलेली ही रचना संस्कृतप्रचूर बंगाली भाषेत मातृभूमीची अभिव्यक्ती करते.

रवींद्रनाथ टागोर यांनी राष्ट्रीय महासभेच्या अधिवेशनात १८९६ यावर्षी प्रथम वंदे मातरम् ही रचना गायली होती. राष्ट्रीय महासभेने याच वर्षी हे गीत, त्यातील पहिली दोन कडवी राष्ट्रगीत म्हणून स्वीकारले आणि अनुसरले. १८९३ यावर्षी या गीतावर आधारित एक सुंदर चित्रांकन प्रकाशित झाले होते. त्यातील समर्पकता आणि अर्थपूर्णता विहंगम आणि तेवढीच प्रेरक वाटते. 'वंदे मातरम्' हे एक मातृभूमीचे अमरस्तोत्र आहे. किंबहुना, जगाच्या कुठल्याही भूप्रदेशात आपल्या मातृभूमीविषयी एवढा अपार श्रद्धाभाव आणि एवढी उत्कट अभिव्यक्ती कुठेही झाली नसेल. अल्पाक्षरत्व, अर्थपूर्णता आणि अर्थसंपन्नता ही या गीताची तीन प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. मातृभूमीचे साक्षात चित्र प्रत्येकाच्या हृदयात करण्याचे सामर्थ्य या गीतामध्ये आहे. हे मातृभूमीचे स्तवन तर आहेच; पण त्याशिवाय त्यामध्ये मातृभूमीच्या कर्तृत्वाचे, तिच्या श्रेष्ठत्वाचे आणि आदरणीय स्वरूपाचे चित्रही रेखाटले आहे.

१९०५ यावर्षी वंगभंगाची चळवळ शिखरावर पोहोचली, तेव्हा हे गीत बंगालमध्ये प्रत्येक गावोगावी, पंचक्रोशीत घुमू लागले आणि सरकारला बंगालची फाळणी रद्द करावी लागली. हा भारतीयांच्या प्रखर देशभक्तीचा अभूतपूर्व विजय होता. महर्षी अरविंद यांनी या गीताचे वर्णन राष्ट्रगीत असे केले. या गीतावर ब्रिटिश सरकारने बंदी घातली आणि कोणीही समूहाने हे गीत म्हटले की, त्यांना तुरुंगात टाकले जाऊ लागले; पण जितका विरोध, तेवढा प्रतिकार या न्यायाने हे गीत कोट्यवधी भारतीयांच्या ओठावर घुमू लागले.ब्रिटिशांनी या गीतावर बंदी घातली, तरीही हे गीत भारताच्या हृदयातून एखाद्या कारंजीप्रमाणे सतत उसळत राहिले, प्रेरणा देत राहिले. २४ जानेवारी १९५० रोजी 'वंदे मातरम्' या गीताचा भारतीय संविधानात समावेश करण्यात आला. यावेळी भारताचे राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी म्हटल्याप्रमाणे, 'जन गण मन' या राष्ट्रगीताच्या बरोबरीने 'वंदे मातरम्'चाही सन्मान केला पाहिजे. डॉ. प्रसाद यांचा हा विचार खरोखरच प्रेरक आणि स्फूर्तिदायक आहे. या गीताच्या सादरीकरणासाठी कला व संगीताच्या पार्श्वभूमीवर केवळ ६५ सेकंद एवढा काळ लागतो. या गीताच्या निर्मितीचे मर्म ब्रिटिश वसाहतवादी व्यवस्थेच्या शोषणात आहे. 'आनंदमठ' कादंबरीमध्ये बंड केलेल्या संन्याशांनी एकत्र येऊन आपल्या मातृभूमीच्या मुक्ततेसाठी गायिलेले हे गीत आहे. कादंबरीचे कथानक आणि गीताची रचना यांचा कालावधी भिन्न असला तरी लेखकाच्या अभिव्यक्तीतील साधर्म्य आणि संतुलन पाहता, तत्कालीन समाजजीवनातील वसाहतवादी सत्तेविरुद्धच्या असंतोषाचा स्फोट या गीतामध्ये झाला आहे. त्यामध्ये देशभक्ती आणि समाजाभिमुख सेवेचा आदर्श यांचा मनोज्ञ संगम झाला असल्याचे दिसून येते. हे गीत त्यामुळे भारताचे राष्ट्रगीत आहे, समाजगीत आहे आणि संस्कृतीगीत सुद्धा आहे.

लाला लजपत राय यांनी लाहोरहून 'वंदे मातरम् या नावाचे पाक्षिक काढले होते. तसेच या काळात, १९६५ मध्ये 'वंदे मातरम्' या नावाचा राष्ट्रीय चित्रपटही प्रदर्शित झाला होता. १९०५ पासून काँग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनात 'वंदे मातरम्' संपूर्णपणे म्हणण्याची प्रथा होती; पण ती पुढे कशी बंद झाली हे मात्र चिंताजनक वाटते. टिळक युगामध्ये हिंदू आणि मुस्लिम सामुदायिकपणे 'वंदे मातरम्' म्हणत असत. लाला लजपत राय यांच्या प्रेरणेने सबंध वायव्य प्रांतात 'वंदे मातरम्' हा पर्वलीचा शब्द बनला होता. १९३७ यावर्षी राष्ट्रीय महासभेने 'वंदे मातरम्'ला राष्ट्रगीत म्हणून मान्यता दिली. पहिल्या दोन कडव्यांमध्ये मातृभूमीविषयीचा सद्भाव आहे, तर शेवटच्या दोन कडव्यांमध्ये दुर्गेचे वर्णन आहे. त्यामुळे पहिल्या दोन कडव्यास मान्यता देण्यात आली. तथाकथित वृथा धर्मनिरपेक्षवाद्यांचा हा बेगडीपणा अनेकांना पटला नाही. 'वंदे मातरम्' या गीताला अनेक भारतीय संगीतकारांनी आणि गायकांनी साज चढविला आहे. लता मंगेशकर, हेमंतकुमार तसेच अलीकडे ए. आर. रहमान, रविशंकर इत्यादींच्या संगीतामुळे सुद्धा हे गीत अधिक लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचले आहे. 'वंदे मातरम्' हे गीत भारताच्या राष्ट्रीय वैभवाचे प्रतीक आहे, सुजलाम् सुफलाम् भूमीचे वैभवगीत आहे. कोटी कोटी लोकांच्या हृदयातील संस्कृतीचा आवाज आहे. सामान्य माणसाने मातृभूमीच्या वैभवाविषयी व्यक्त केलेला हा एक आत्मविश्वास आहे. जनसामान्यांच्या आशा, आकांक्षा आणि अभिव्यक्ती पल्लवित करणारे हे गीत भारताच्या राष्ट्रीय अस्मितेचे प्रतीक बनले आहे. हजारो क्रांतिकारकांच्या त्या सेवा आणि समर्पणाचे हे एक मूलतत्त्व आहे. धर्म, संस्कृती आणि राष्ट्राचा सन्मान याचे रक्षण करण्यासाठी हजारो हुतात्म्यांनी शहीद म्हणून रक्त सांडले. त्या रक्ताची आठवण ठेवून मातृभूमीला परिपूर्ण सुजलाम् सुफलाम् बनविणे हेच खरे महत्त्वाचे कर्तव्य होय. 'वंदे मातरम्'चा तोच खरा संदेश होय, तोच खरा अर्थ होय.

# भारताचे विकासासाठी समुद्रमंथन

नवअर्थकारणाच्या लाटांवर स्वार होण्यास भारत सज्ज आहे. सागरी संबंधातील घटनांमधील 'वाढवण बंदर' आणि 'ग्रेट निकोबार प्रकल्प' हे त्याचा पहिला टप्पा ठरू शकतात. जागतिक व्यापारातील व्यापारतणाव व विकासाच्या स्पर्धेत दळणवळणाच्या देशांतर्गत पारंपरिक सोयीसुविधांबरोबरच सागरीमार्ग आणि बंदरांच्या विकासाचे महत्त्व अधोरेखित करणार्या मागील आठवड्यातील दोन घटना दखलपात्र ठरतात. त्यातील पहिली घटना ही मलेशियातील क्वालालंपूर येथील 'आसियान' देशांच्या संमेलनामध्ये भारताच्या वतीने आगामी २०२६ मध्ये 'आसियान–भारत सागरी सहकार्य वर्ष' म्हणून जाहीर करणे ही होय, तर दुसरी मुंबईतल्या 'भारत सागरी आठवडा' ही जागतिक समुद्र आणि सागरी वाहतूक क्षेत्रातील सर्वात मोठी पाच दिवसांची परिषद ही होय.

भारताने 'आसियान'मधील देशांसोबतचे मैत्रीसंबंध अधिक वृद्धिंगत करण्याचा निर्धार या निमित्ताने केला आहे. अर्थात या निर्धाराचे महत्त्वाचे आधार हे 'सागरी सुरक्षा' आणि 'नील अर्थव्यवस्था' हे दोन घटक होत. सागरी आठवडा परिषदेत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी 'अमृतकाल–२०४७' अंतर्गत विकसित भारताचे लक्ष्य हे सागरी क्षेत्राद्वारे पूर्ण करणार असल्याचे सांगितले. ही दोन्ही संमेलने आणि त्यात भारतीय नेतृत्वाने केलेले सुतोवाच यातून देशाचे भविष्यातील अर्थकारण नेमके कोणत्या दिशेने जाणार हे स्पष्ट होते.



मुंबईतील सागरी परिषदेत ५५ हजार ९६९ कोटी रुपयांच्या १५ विविध सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आल्या. सागरी वाहतुकीला बुस्टर डोस देण्यासाठी 'सागरमाला' प्रकल्पांतर्गत ७० अब्ज डॉलर्सचे प्रकल्प प्रस्तावित आहेत. एकीकडे अमेरिकेने लादलेल्या आयातशुल्क धोरणामुळे आर्थिक आघाडीवर देशाची मोठी गळचेपी झाली असतानाच शेजारील चीनच्या आव्हानांकडे भारताला डोळेझाक करून चालणार नाही. म्हणूनच 'आसियान'सोबतचे 'समुद्रमंथन' महत्त्वाचे पाऊल ठरते. अमेरिका आणि चीन या दोन महासत्तांमधील संघर्षाचे धक्के जगातील अन्य देशांसह 'आसियान'लाही सहन करावे लागत आहेत. नव्या अर्थकारणाच्या धमन्या म्हणून ओळखल्या जाणार्या मायक्रोचीप, बंदरे आणि डिजिटल कनेक्टीव्हिटी यांच्या आधारे वर्चस्व गाजवण्याचे दोन्ही देशांचे मनसुबे लपून राहिलेले नाहीत.

मलेशियन बिट्सवरील ट्रम्प डान्स ते सांगू पाहतो. सिंगापूर असो नाहीतर इंडोनेशिया अथवा दक्षिण कोरिया; ड्रॅगनने सगळीकडे आपले व्यापारजाळे विस्तारले आहे. याला शह देण्यासाठी अमेरिका 'आसियान'चे दार ठोठावताना दिसते. नव्या आर्थिक युगाचा ऑक्सिजन ठरू पाहणार्या दुर्मिळ खनिजांचा प्रवाह रोखून धरत चीन अमेरिकेप्रमाणेच जगाची कोंडी करताना दिसतो. अर्थात याची झळ भारतालाही सहन करावी लागणार आहे. त्यामुळे भविष्यातील चीनवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी भारताला 'आसियान'च्या सहकार्याने पर्यायी अर्थकारणाची उभारणी करावी लागणार आहे.

अमेरिकन अध्यक्ष ट्रम्प आता 'आसियान'लाही व्यापारी कराराचे आमिष दाखवून गळाला लावू पहात आहेत. मायक्रोचीप उद्योग आपल्याच ताब्यात रहावा, म्हणून त्यांची धडपड सुरू आहे. सध्या जागतिक महासत्तापद हे पारंपरिक अर्थकारणावर अवलंबून राहिलेले नसून, ते चीप, पोर्ट, डेटा कंट्रोल आणि सप्लाय चेन हे घटक इथून पुढे अर्थकारणाची दशा आणि दिशा निश्चित करतील. भारतालाही याच घटकांवर प्रभूत्व निर्माण करावे लागेल. 'आसियान' देशांचा अमेरिकेसोबतचा दरवर्षीचा व्यापार हा ३७ ते ४१ लाख कोटी रुपये एवढा आहे.

चीनसोबत त्याचे प्रमाण हे ५८ ते ७५ लाख कोटी रुपये एवढे आहे. या न्यायाने चीन हा 'आसियान' देशांचा सर्वांत मोठा व्यापारी भागीदार ठरतो. भारत आणि 'आसियान' देशांतील व्यापाराचे प्रमाण ११ ते १२ लाख कोटी एवढे आहे. यात वाढ करण्यासाठी भारताला 'आसियान'मधील गुंतवणूक वाढवावी लागेल. तसेच उत्पादनांची गुणवत्ता, स्पर्धात्मकता याकडेही लक्ष द्यावे लागेल. आपल्याला 'आसियान'च्या सहकार्याने समुद्रमंथन घडवून आणणे अपरिहार्य ठरते. 'आसियान'चे घटक असलेले अकरा देश हे जगातील सर्वांत मोठी पाचवी अर्थव्यवस्था आहेत.

वैश्विक पुरवठासाखळीचे महत्त्वाचे केंद्र असलेल्या या देशांना वगळून आपल्याला पर्यायी अर्थकारण उभे करता येणार नाही. तसेही अमेरिका आणि युरोपातील बहुराष्ट्रीय कंपन्यांनी चीनऐवजी 'आसियान' देशांमध्ये तळ हालवायला सुरुवात केली आहे. अशा स्थितीत भारताच्या पर्यायी अर्थकारणात हे देश महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतात. नव्या आर्थिक समीकरणाशी जूळवून घेण्यासाठी भारतालाही तशीच समीकरणे आखावी लागतील. आगामी काळात देशाच्या समुद्री क्षेत्राची क्षमता वाढविण्यासाठी २ लाख २३ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करून ४३७ नवीन जहाजे उतरविण्यात येणार आहेत. खनिज तेल उत्खनन, कंटेनर, टँकर, ड्रेजर्स किंवा गाळ काढणारी जहाजे यांचा त्यामध्ये समावेश असेल.

या गुंतवणुकीसाठी भारत कंटेनर शिपिंग लाइन उपक्रमाची घोषणा करण्यात आली. खरे तर जी–२० राष्ट्रगटाचे अध्यक्षपद भारताकडे आल्यानंतर 'नील अर्थव्यवस्था' केंद्रस्थानी आली. तिच्या विकासासाठी जी–२० राष्ट्र गटांच्या माध्यमातून संशोधन, शिफारशी केल्या जाणार आहेत. जागतिक तापमानवाढ, सागरी स्रोतांचा शाश्वत विकास, सागरी परिसंस्थेसमोरील धोके ही महत्त्वाची आव्हाने जगासमोर आहेत. जागतिक बँकेतील पर्यावरणतज्ज्ञ तापस पॉल यांच्या अंदाजानुसार, जागतिक पातळीवर सागरी स्रोतांचे मूल्य २४ लाख कोटी डॉलर एवढे आहे. सागरी संपत्तीचा संतुलित पद्धतीने विकास व वापर होणे आवश्यक आहे. या नव्या समुद्रमंथनातून विकासाचे मोती काढले पाहिजेत.

# रंगभूमीचा नवश्वास

मराठी रंगभूमीला जवळजवळ १७० हून अधिक जास्त वर्षांची परंपरा आहे. १८४३ मध्ये 'सीता स्वयंवर'ने सुरू झालेला हा प्रवास आजही अविरत सुरू आहे. आज रंगभूमीदिन. त्या निमित्ताने समोर लाल पडदा, त्या पहिल्या दोन घंटा, तिकिटासाठी आणि आपल्या जागेवर बसण्यासाठीची लगबग, प्रेक्षागृहात पसरलेला धूप सुगंध, नेपथ्यासाठी व्यासपीठावर होणारी दबकी हालचाल, हळू आवाजात लागलेले संगीत आणि कानावर पडते तिसरी घंटा. पडदा उघडला जातो, लख्ख प्रकाशाने स्टेज उजळतं आणि नाटकाचा पहिला अंक सुरू होतो. हे नाटक पाहणं असो नाटकात एखादी भूमिका करणे असो किंवा बॅकस्टेज आर्टिस्ट म्हणून काम करणं असो ही एक ऊर्जा देणारी कृती असते. ज्या व्यक्तीला नाटकाचे वेड लागते ना त्याला ती आयुष्यभर नशाच चढते. हो इथे मी नशा हा शब्द खूप विचारपूर्वकच वापरलाय कारण अशी वेड्यासारखी नशा असल्याशिवाय नाटकांसारख्या कलाकृतीची निर्मिती होऊ शकत नाही.

मनोरंजन आणि प्रबोधन या दोन्हीही बाबी सांस्कृतिक क्षेत्राने लीलया साधल्या आहेत. यात फक्त मराठी नाटकाचा समावेश आहे असे नाही तर नृत्य, वादन, गायन विविध कलांचाही तितक्याच बरोबरीचा वाटा आहे. १८४३ मध्ये मराठी रंगभूमीचा पाया रचला गेला. चिंतामणराव पटवर्धन यांच्या आश्रयात विष्णुदास भावे यांनी ५ नोव्हेंबर या दिवशी 'सीता स्वयंवर' या नाटकाचा प्रयोग केला आणि तिथूनच मराठी नाट्य क्षेत्राच्या पर्वाची सुरुवात झाली. १९४३ मध्ये या दिवसाच्या स्मरणार्थ या क्षेत्रातील सर्व नामवंत कलाकारांनी एकत्र येऊन सांगली येथे शताब्दी महोत्सव साजरा केला.




या संमेलनाचे अध्यक्ष वि. दा. सावरकर हे होते. याच दिवशी नाट्यविद्येच्या संवर्धनासाठी अखिल महाराष्ट्र नाट्य विद्या मंदिर समिती स्थापन करण्यात आली. यावेळी सर्व नाट्यरसिकांच्या साक्षीने सांगलीला ठराव करून हा दिवस 'मराठी रंगभूमी दिन' म्हणून घोषित करण्यात आला. याच दिवशी रंगभूमीच्या प्रदीर्घ काळ सेवा करणार्या कलावंताला 'विष्णुदास भावे पुरस्कार' देऊन गौरवण्यात येते. स्वातंत्र्यपूर्व काळात विष्णुदास भावे यांनी एक टुरिंग थिएटर ग्रुप तयार केला. शतकाच्या उत्तरार्धात मराठी रंगभूमीवर झाशीच्या राणीचे नाटक, मल्हारराव महाराज, सवाई माधवराव इ. अशी उल्लेखनीय नाटके पाहायला मिळाली. याच काळात म्हणजे १८८० मध्ये अण्णासाहेब किर्लोस्करांच्या 'संगीत शाकुंतल' या कालिदासाच्या 'अभिज्ञानकुंतलम' या शास्त्रीय कृतीवर आधारित मराठी रंगमंचाने एक वेगळे रंगभूमीचे रूप धारण केले. अशा नाटकांच्या यशानंतर नाटक कंपन्यांची निर्मिती व्हायला सुरुवात झाली. मराठी रंगभूमीला संगीत नाटकांची नव्याने ओळख करून देऊन रंगभूमीला समृद्ध करणारे गोविंद बल्लाळ देवल, राम गणेश गडकरी, कोल्हटकर यासारख्या कलाकारांनी नाटक खूप मोठ्या उंचीवर नेऊन ठेवलं. याच काळात बालगंधर्व, दिनानाथ मंगेशकर, केशवराव भोळे यासारख्या गायक अभिनेत्यांनी रंगभूमी संगीतमय केली. हळूहळू नाट्य संहितेमध्ये, नेपथ्यामध्ये थोडं वेगळेपण येऊ लागलं. नाटकांमध्येच दशावतार, तमाशांचाही समावेश करण्यात आला. पारंपरिक कलांचा समावेश असणारी नाटके विशेष पसंतीस पडू लागली.

बशीर मोमीन, वेडात मराठे वीर दौडले सात, घाशीराम कोतवाल, भंगले स्वप्न महाराष्ट्र यासारखे नाटके व मराठी रंगभूमीला लाभलेले लेखक दिग्दर्शक जसे की विजय तेंडुलकर, विजया मेहता ही माणसे झपाटल्यासारखी विविध प्रयोग करून त्यांनी नाटक क्षेत्राला एक वेगळा आयाम दिला. अजब न्याय वर्तुळाचा, तीन पैशाचा तमाशा, तो मी नव्हेच, ती फुलराणी, वार्यावरची वरात अशी नाटके आजही नवनवीन कलाकारांना अभिनय दिग्दर्शनाचे धडे देत आहेत. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या प्रारंभी कलात्मक आणि प्रायोगिक दृष्टीने रंगभूमीकडे पाहण्याची प्रवृत्ती निर्माण झाली.

प्रतिभावंत नाटककार, दिग्दर्शक, कल्पक तंत्रज्ञ, आधुनिक यांत्रिक सुविधा व अभिरुची संपन्न रसिक अशी त्या त्या काळानुसार बदलत गेली; पण नाटकाची मूळ मात्र खोल रुजतच गेली. आधुनिक नाट्यप्रयोगात प्रभावी प्रकाश योजना, रंगमंच तंत्राचा कलात्मक वापर त्या त्या प्रसंगानुसार चपखल बसणारे संगीत यामुळे नाट्य कृती ही सर्जनशीलतेचा भाग बनत गेली. विजय तेंडुलकरांचे 'शांतता कोर्ट चालू आहे', वसंत कानिटकरांचे 'अश्रूंची झाली फुले', पु. ल. देशपांडे यांचं 'तू मला मी तुला' यासारख्या नाटक कृतींनी नाटकांकडे वेगळ्या दृष्टीने पाहायची सवय प्रेक्षकांना लावली. यांनी सामाजिक, राजकीय विषयांवर प्रयोगशील दृष्टी टाकून कलाकृती उल्लेखनीय करून ठेवल्या.

सर्वसाधारण १९७० नंतर समकालीन आणि प्रयोगशील रंगभूमीचा उदय झाला. नव्या विचारधारेचा प्रभाव नाट्यकृतींवर पडत गेला. एकांकिका, लघुरूप नाटके यांची गुणवत्तारुपी संख्या वाढू लागली. युवा नाट्य महोत्सव, नाट्य स्पर्धा आणि नाट्यसंस्था वेगाने वाढायला लागल्या त्यामुळे सांस्कृतिक क्षेत्रात भरीव कामगिरी होऊ लागली. या पर्वाचं श्रेय नाटककार आणि कलाकार महेश एलकुंचवार, सतीश आळेकर, चंद्रकांत कुलकर्णी, मोहन आगाशे, नाना पाटेकर, मकरंद देशपांडे या आणि यासारख्यांना जातं. आज नाट्यकला फक्त मनोरंजनापुरते राहिलेले नाही.

सामाजिक वास्तव, मानसिक ताण, नातेसंबंधांमधील गुंतागुंत, स्त्री पुरुष समानता यासारखे विषयसुद्धा नाट्यरूपात येऊ लागले आहेत. पारंपरिक रंगमंचाऐवजी छोट्या जागेत, खुल्या प्रांगणातही प्रयोगशील नाट्यप्रयोग होताना दिसत आहेत. या क्षेत्राकडे तरुणाईचा पाहण्याचा दृष्टिकोन बदलतोय. दिग्दर्शन, अभिनय, संगीत, लेखन इत्यादी सारख्या क्षेत्रात डिग्री प्राप्त करून करिअर करण्याकडे वळणारा वर्गही सध्या वाढतो आहे. ओटीटी आणि सोशल मीडियाच्या जगात प्रेक्षकही नाट्यगृहात जाऊन कलाकृतीचा आनंद घेण्याकडे वळत आहे. ऑनलाइनद्वारे नाट्यकृती पाहता येत असल्याने परदेशातही याची आवड जोपासणे सोपे झाले आहे.

अर्थात दुसरा कंगोरा या क्षेत्राचा तितकाच विचार करायला लावणारा आहे की, नाटके टिकवण्यासाठी निर्मात्यांना आर्थिक स्थैर्य आणि प्रेक्षकांचा सातत्यपूर्ण प्रतिसाद गरजेचा आहे.

नाटक आजही विचार करायला लावते, समाजाला आरसा दाखवते आणि संवेदनशीलता शिकवते. मराठी रंगभूमी ही श्वासासारखी आहे, जी काळाच्या प्रत्येक टप्प्याशी नाळ जोडते, विचारांच्या नव्या रंगांनी नटते. 'पळशेची विहीर'सारख्या नाटकातून स्त्री अस्तित्वाचा शोध दिसतो. मराठी रंगभूमीचा इतिहास 'गोष्ट संयुक्त मानापमानाची' या नाटकातून उजळून निघाला. अगदी सध्याच्या नाटकांचा उल्लेख करायचा झाला तर लीना भागवतांचं 'आमने–सामने' नाटक नातेसंबंध सारख्या विषयाला वेगळ्या प्रकारे स्पर्शून जाते. एका बाजूला असे संवेदनशील विषय हाताळताना दोन वाजून २२ मिनिटे सारखी भयभीत करणारे नाटके प्रेक्षकांची मने जिंकत आहेत. मोहित टाकळकर सारख्या दिग्दर्शकाने मराठी, हिंदी, इंग्रजी भाषांमध्ये प्रयोगशील नाटकांना समृद्ध केलं.

घंटा घंटा घंटा, हुंकारो सारख्या कलाकृतींना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. यासारख्या खूप कलाकारांची नावे घेता येतील पण त्यातील काही म्हणजे निपुण धर्माधिकारी (देहभान, सुलतान, संध्याकाळच्या सावल्या, अमर फोटो स्टुडिओ), चंद्रकांत कुलकर्णी (वास्तव, चारचौघी), प्रसाद वनारसे (दुसरी गोष्ट, लपाछपी, अंतरा), मकरंद साटवलकर (काय बरे झालं असतं तर, कथा अकाल पिढीची), अभिजीत झुंजारराव (एका लग्नाची दुसरी गोष्ट, काय चाललंय काय?) अमित पाटील (साखर खोबरे, एक लाजरे लाडके प्रकरण) या अशा सध्याच्या काळातल्या उल्लेखनीय नाटककार दिग्दर्शकांनी नाट्य क्षेत्रात नव्या विचारांना जन्म दिला.

आजकालच्या नाटकांनी केवळ मनोरंजनच नाही केलं तर प्रेक्षकांना विचार करायला शिकवलय. आज मराठी रंगभूमी नवनव्या विचारांनी, प्रयोगातून फुलते आहे. या प्रवासाला शेवट नाही कारण प्रत्येक नवीन नाटक एका नव्या विचाराला, युगाला जन्म देते. अशा या नाट्यकलेने पुन्हा पुन्हा सिद्ध केले आहे की, रंगमंच कधीच वृद्ध होत नाही, तो प्रत्येक पिढीत नव्या रूपात पुन्हा जन्म घेऊन वेगळ्या रूपात प्रेक्षक मायबाप समोर अवतरतो.

# चेहऱ्यावर वाढलेल्या टॅनिंगमुळे त्वचा खूप निस्तेज दिसते? चमचाभर हळदीचा 'या' पद्धतीने करा वापर, १५ मिनिटांमध्ये त्वचा दिसेल उजळदार

सणावाराच्या दिवसांमध्ये सगळ्यांचं आपली त्वचा अतिशय चमकदार आणि सुंदर हवी असते. पण वातावरणात होणाऱ्या बदलांमुळे आणि चुकीच्या जीवनशैलीमुळे त्वचेसंबंधित अनेक गंभीर समस्या उद्भवू लागतात. सतत धूळ, माती, प्रदूषणाच्या सानिध्यात राहिल्यामुळे त्वचेवर डेड स्किन जमा होण्यास सुरुवात होते. चेहऱ्यावर वाढलेल्या टॅनिंगमुळे त्वचा अतिशय निस्तेज दिसते. अशावेळी महिला बाजारात उपलब्ध असलेल्या महागड्या ट्रीटमेंट, पार्लरमधील फेशिअल किंवा क्लीनअप करून घेतले जाते. पण यामुळे काही काळापुरती त्वचा अतिशय चमकदार आणि सुंदर वाटते. पण कालांतराने पुन्हा एकदा त्वचेसंबंधित समस्या उद्भवू लागतात. टॅनिंगमुळे त्वचेचा रंग बदलण्यासोबतच मान, हातांचे कोपरे इत्यादी अवयवांवर काळेपणा वाढू लागतो. बऱ्याचदा घाईगडबडीमुळे त्वचेकडे लक्ष देण्यास जास्तीचा वेळ मिळत नाही.

वर्षाच्या बाराही महिने त्वचेची योग्य काळजी घेणे आवश्यक आहे. कारण त्वचेची खराब झालेली गुणवत्ता सुधारण्यासाठी खूप जास्त वेळ लागतो. चेहऱ्याला वरून पोषण देण्यासोबतच आतून पोषण देणे सुद्धा तितकेच आवश्यक आहे. सुंदर त्वचेसाठी स्किन केअर रुटीन फॉलो करण्यासोबतच घरगुती उपाय करून सुद्धा त्वचा सुंदर होते. आज आम्ही तुम्हाला चेहऱ्यावरील टॅनिंग घालवण्यासाठी चमचाभर हळदीचा वापर कसा करावा, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. हा फेसपॅक त्वचा अतिशय उजळदार आणि सुंदर करतो.

फेसपॅक बनवण्याची सोपी कृती: फेसपॅक बनवण्यासाठी हळद, लिंबाचा रस आणि मध, कॉफीचा वापर करावा. वाटीमध्ये कॉफी पावडर घेऊन त्यात मध, भाजलेली हळद, लिंबाचा रस टाकून मिक्स करा. तयार केलेले घट्टसर मिश्रण मान आणि चेहऱ्यावर लावून काहीवेळ तसेच ठेवा. त्यानंतर



हातांना पाणी लावून हलक्या हाताने चेहऱ्यावर मसाज करून घ्या. यामुळे डेड स्किन कमी होण्यास मदत होईल. हा फेसपॅक नियमित चेहऱ्यावर लावल्यास त्वचेवर वाढलेले टॅनिंग कमी होण्यास मदत होईल आणि चेहरा अतिशय सुंदर दिसेल. मान आणि हातांचे कोपरे स्वच्छ करण्यासाठी फेसपॅकचा वापर करावा.

जेवणातील सर्वच पदार्थ बनवताना हळदीचा वापर केला जातो. हळदीमध्ये असलेले कर्क्यूमिन त्वचेमध्ये वाढलेली जळजळ कमी करण्यास मदत करते. त्यामुळे फेसपॅक तयार करताना हळद भाजून घ्यावी. मध त्वचा उजळदार करण्यासाठी मदत करते. त्वचा स्वच्छ करण्यासाठी इतर कोणत्याही महागड्या स्किन केअरचा वापर कारण्याऐवजी घरगुती पदार्थांचा वापर करून त्वचेची काळजी घ्यावी.

# वाढलेले वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी रोजच्या जेवणात करा अळशीच्या चटणीचे सेवन, नोट करून घ्या रेसिपी

शरीराचे वाढलेले वजन कमी करण्यासाठी आहारात वेगवेगळ्या पदार्थांचे सेवन केले जाते. पण चुकीच्या पदार्थांचे सेवन केल्यामुळे आरोग्य बिघडते आणि वजन कमी होण्याऐवजी आणखीनच वाढत जाते. वजन वाढल्यानंतर ते कमी करण्यासाठी महागडे सप्लिमेंट्स, गोळ्या औषध आणि डाएट फॉलो केला जातो. पण त्याऐवजी नियमित आहारात जवसाच्या चटणीचे सेवन केल्यास महिनाभरात वाढलेले वजन कमी होण्यास मदत होईल. महिलांच्या आरोग्यासाठी आळशी अतिशय प्रभावी ठरतात. जवस खाल्यामुळे वजन कमी होण्यासोबत संपूर्ण शरीराला फायदे होतात. यामध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड, फायबर, प्रोटीन आणि अँटीऑक्सिडंट्स इत्यादी अनेक घटक आढळून येतात. ही चटणी शरीरात वाढलेले कोलेस्ट्रॉल नियंत्रणात ठेवण्यासाठी मदत करते. अनेक लोक जवसाच्या बियांचे सेवन सॅलड, दही किंवा स्मूदीमध्ये सुद्धा टाकून खातात. चला तर जाणून घेऊया जवस चटणी बनवण्याची सोपी रेसिपी.





साहित्य:

अळशीच्या बिया
लसूण
लाल मिरच्या
जिरं
मीठ
हिरवी मिरची
जिरं
हळद
कोथिंबीर
तेल

कृती: चटणी बनवण्यासाठी सर्वप्रथम, तव्यावर अळशीच्या बिया हलक्याशा भाजून घ्या. त्यानंतर बिया ताटात काढून घ्या.

तव्यावर तेल गरम करून त्यात जिरं, लसूण, हिरव्या मिरच्या आणि सुक्या लाल मिरच्या टाकून हलक्याशा भाजून घ्या.

त्यानंतर त्यात टोमॅटोचे तुकडे टाकून ५ ते ६ मिनिटं भाजून घ्या. नंतर त्यात हळद टाकून मिक्स करा.

मिक्सरच्या भांड्यात भाजून घेतलेले सर्व पदार्थ टाकून भाजलेल्या अळशीच्या बिया, मसाले, मीठ आणि लिंबाचा रस घालून बारीक पेस्ट वाटून घ्या.

वाटून घेतलेली चटणी वाटीमध्ये काढून सर्व्ह करा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली अळशीच्या बियांची चटणी.

# चंद्राच्या मंद प्रकाशाला मधुर दुधाची साथ! कोजागिरी पौर्णिमेनिमित्त लाडक्या प्रियजनांना पाठवा गोड शुभेच्छा

राज्यासह संपूर्ण देशभरात कोजागिरी पौर्णिमा साजरा केली जाते. हिंदू धर्मामध्ये कोजागिरी पौर्णिमेला विशेष महत्व आहे. मान्यतेनुसार यावेळी चंद्र त्याच्या १६ चरणांसह पूर्णपणे तयार होतो आणि पृथ्वीवर अमृत वर्षाव करतो. म्हणून या पौर्णिमेच्या दिवशी चंद्र देवाची विशेष पूजा केली जाते. तसेच घरामध्ये मसाला दूध बनवून चंद्राला नैवेद्य म्हणून दाखवला जातो.याशिवाय महाराष्ट्रामध्ये दुधात चंद्राचे दर्शन घेतले जाते. पारंपरिक मान्यतेनुसार, कोजागिरी पौर्णिमेच्या रात्रीपासून वातावरण गारवा निर्माण होतो आणि सगळीकडे थंडी असते. त्यामुळे कोजागिरी पौर्णिमेनिमित्त लाडक्या प्रियजनांना तुम्ही या गोड शुभेच्छा पाठवू शकता. या शुभेच्छा वाचून सगळ्यांचं खूप आनंद होईल.

कोजागिरी पौर्णिमा तुमच्या आयुष्यात सौख्य, मांगल्य, समृद्धी आणि दीर्घायुष्य घेऊन येणारी ठरो! हीच आमची कामना कोजागिरी पौर्णिमा निमित्त हार्दिक शुभेच्छा !



रात्र पौर्णिमेची सजली ही अशी, नववधू रुपेरी साजात जशी.. दूध आटवूया चंद्र प्रकाशात, प्रतिबिंब पाहुया चंद्राचे त्यात.. कोजागिरी करू साजरी हर्षाने, आश्विनाची पौर्णिमा आली वर्षाने.. कोजागिरी पौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा. कोजागिरी पौर्णिमा आजचा दिवस तुमच्यासाठी सुखकारक आणि आनंददायक असावा हिच सदिच्छा कोजागिरीच्या हार्दिक शुभेच्छा! कान्हाच्या गडद रंगाच्या विखुरलेल्या छटा अफाट आहेत, पौर्णिमेच्या तेजस्वी प्रकाशात ती कृष्णाला भेटली, आज रास लीला होणार आणि सारे जग नाचणार कोजागरी पौर्णिमेच्या शुभेच्छा शरद पौर्णिमेची पवित्र रात्र, तुमच्यावर आणि तुमच्या कुटुंबावर, अमृत आणि सोमरस बरसले, आणि सुखाचा आणि समृद्धीचा पाऊस येवो. कोजागरी पौर्णिमेच्या शुभेच्छा शरद पौर्णिमेचा सण जावो हीच प्रार्थना, तुम्हाला जीवनात आनंद आणि समृद्धी देवो, या दिवशी तुम्हाला देवी लक्ष्मीची कृपा लाभो. हा सण तुमच्या जीवनात मंगलमय होवो.

मंद प्रकाश चंद्राचा, त्यात गोड स्वाद दुधाचा, विश्वास वाढु द्या नात्याचा, त्यात असु दे गोडवा साखरेचा, कोजागिरी पौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!

आली कोजागिरी पौर्णिमा, शरदाचे चांदणे घेऊन.. कोण कोण जागे हे पाहते, लक्ष्मी दाराशी येऊन.. आजची कोजागिरीची रात्र सुखकारक व आनंदाची उधळण करणारी जावो हीच सदिच्छा! कोजागिरी पौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा.

# नाश्त्यात काहीतरी नवीन खायचं असेल तर सोप्या पद्धतीमध्ये झटपट बनवा कुरकुरीत बटाट्याचा चिल्ला, नोट करून घ्या रेसिपी

सकाळच्या नाश्त्यात कायमच कांदापोहे, उपमा, शिरा, इडली, डोसा किंवा मेदुवडा खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन पदार्थ खाण्याची सगळ्यांचं इच्छा होते. सकाळच्या वेळी पोटभर नाश्ता केल्यास संपूर्ण दिवस आनंद आणि उत्साहामध्ये जातो. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये कुरकुरीत बटाट्याचा चिल्ला बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. हा पदार्थ लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं खूप जास्त आवडेल. याशिवाय लहान मुलांच्या डब्यामध्ये सुद्धा बटाट्याचा चिल्ला तुम्ही देऊ शकता. सकाळच्या घाईगडबडीमध्ये नाश्त्यात काय बनवावं बऱ्याचदा सुचत नाही. अशावेळी बटाट्याचा चिल्ला अतिशय उत्तम पर्याय आहे. लहान मुलांना





सकाळच्या नाश्त्यात कायमच हेल्दी पदार्थ खाण्यास द्यावेत. अतितिखट किंवा तेलकट पदार्थ खाण्यास मुलांना देऊ नये. चला तर जाणून घ्या बटाट्याचा चिल्ला बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:

बटाटा
बेसन
तांदळाचे पीठ
लाल तिखट
हळद
मीठ
हिरवी मिरची
धणे पावडर
ओवा
मीठ
पाणी

कृती: बटाट्याचा चिल्ला बनवण्यासाठी सर्वप्रथम, बटाट्याची साल काढून बटाटा किसून घ्या. त्यानंतर किसलेला बटाटा काहीवेळ पाण्यात भिजवत ठेवा. यामुळे त्यातील स्टार्च बाहेर पडून जातील.

मोठ्या वाटीमध्ये बटाटे, बेसन, तांदळाचे पीठ, कांदा, हिरवी मिरची , आले, धणे पावडर आणि बारीक चिरलेली कोथिंबीर टाकून व्यवस्थित मिक्स करून घ्या.


तयार केलेल्या पिठात आवश्यकतेनुसार पाणी घालून चिल्ला बनवण्याचे बॅटर बनवून घ्या. तवा गरम करण्यासाठी ठेवा.

तव्यावर थोडेसे तेल टाकून तयार केलेल्या चिल्याचे बॅटर पसरवून घ्या. दोन्ही बाजूने चिल्ला व्यवस्थित कुरकुरीत करून घ्या.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेला बटाट्याचा चिल्ला. हा पदार्थ सॉस किंवा कोणत्याही चटणीसोबत अतिशय सुंदर लागेल.

# कफ सिरपमधील डायएथिलिन ग्लायकॉल नक्की काय आहे? यामुळे झाला ११ मुलांचा मृत्यू

भारतात कफ सिरप हे एक अतिशय सामान्य औषध आहे. त्यामुळे, जर ते सेवन केल्यानंतर मुले मरण पावली तर ती एक अतिशय गंभीर बाब बनते. मध्य प्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यात अशीच एक घटना घडली, जिथे कफ सिरप सेवन केल्यानंतर ११ मुलांचे मूत्रपिंड निकामी होऊन मृत्यू झाले. कफ सिरपमध्ये डायथिलीन ग्लायकोल (ऊएॠ) नावाचे द्रावक होते, जे औषधे विरघळवण्यासाठी वापरले जाते. हे रसायन विषारी होते आणि त्यामुळे ११ मुलांचा मृत्यू झाला. हे रसायन सामान्यतः वाहनांच्या ब्रेक, इंजिन आणि पेंटमध्ये वापरले जाते.





डायथिलीन ग्लायकोल म्हणजे काय?

डायथिलीन ग्लायकोल (ऊएॠ) हे एक रासायनिक द्रावक आहे जे द्रावक म्हणून काम करते. याचा अर्थ असा की जर एखादी गोष्ट विरघळत नसेल, तर त्यात हे रसायन टाकल्याने ते विरघळते. या प्रकारचे द्रावक औषधांमध्ये वापरले जाते. रांची येथील प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. शैलेश चंद्र यांनी स्पष्ट केले की, डायथिलीन ग्लायकोल हे एक धोकादायक आणि प्राणघातक रसायन आहे. ते औषधांमध्ये वापरू नये. या प्रकारचे औषध तयार करणारी कंपनी निष्काळजी आहे. औषधे सॉल्व्हेंट्स वापरतात कारण अनेक औषधे पाण्यात विरघळत नाहीत. तथापि, वापरलेले द्रावक आणि त्याची सुरक्षितता देखील विचारात घेणे महत्त्वाचे आहे. वाहनांच्या ब्रेक आणि इंजिनमध्ये योग्यरित्या कार्य करण्यासाठी डायथिलीन ग्लायकॉलचा वापर केला जातो. हे द्रव विषारी आहे.

डायथिलीन ग्लायकॉल बहुतेकदा पेंट्स, प्लास्टिक आणि वाहनांच्या ब्रेक आणि इंजिनमध्ये वापरला जातो. हे रसायन वाहनांच्या इंजिनमध्ये ब्रेक फ्लुइड आणि अँटीफ्रीझ म्हणून वापरले जाते. गिळल्यावर, इथिलीन ग्लायकॉल विषारी संयुगांमध्ये मोडते ज्यामुळे मूत्रपिंडाचे गंभीर नुकसान होऊ शकते आणि मृत्यू देखील होऊ शकतो. डॉ. शैलेश स्पष्ट करतात की, हे रसायन अत्यंत धोकादायक आणि विषारी आहे. कोणत्याही वयोगटातील लोकांसाठी औषधांमध्ये ते वापरू नये. ते विशेषतः मुलांसाठी धोकादायक आहे. डॉ. शैलेश स्पष्ट करतात की, मुलांचे वजन कमी असते, म्हणून जेव्हा विषारी रसायन त्यांच्या शरीरात प्रवेश करते तेव्हा त्याचे परिणाम अत्यंत धोकादायक असतात आणि ते घातक ठरू शकतात.

ऑर्किड हॉस्पिटलचे डॉ. रणजित कुमार यांनी स्पष्ट केले की, हे एक अत्यंत विषारी रसायन आहे. अगदी कमी प्रमाणात देखील अत्यंत धोकादायक आहे, म्हणूनच त्याचा वापर मुलांचे मृत्यूचे कारण बनला आहे. कोणताही कफ सिरप घेण्यापूर्वी नेहमीच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा आणि सर्व घटकांची पूर्णपणे तपासणी केल्यानंतरच रुग्णांना औषधे लिहून देणे हे त्यांचे कर्तव्य आहे.

थक्ञ ने डायथिलीन ग्लायकॉल बद्दल गंभीर इशारा जारी केला आहे, ज्यामध्ये असे म्हटले आहे की २०२२ पासून जगभरात या रसायनाच्या वापरामुळे मुलांचे मृत्यू झाले आहेत. या रसायनाचा वापर निषेधार्ह आहे आणि त्यात असलेले कोणतेही औषध धोकादायक आणि संभाव्यतः घातक ठरू शकते.

इंडियन एक्सप्रेसमधील एका वृत्तानुसार, मध्य प्रदेश अन्न आणि औषध प्रशासन नियंत्रक कार्यालयाने शुक्रवारी श्रीसन फार्मास्युटिकल्सने उत्पादित केलेल्या कोल्ड्रिफ सिरपबाबत राज्यातील सर्व औषध निरीक्षकांना तात्काळ निर्देश जारी केले. तामिळनाडूमध्ये केलेल्या प्रयोगशाळेतील चाचण्यांनंतर हा आदेश जारी करण्यात आला, ज्यामध्ये औषधाबद्दल धक्कादायक निष्कर्ष उघड झाले आहेत. चेन्नईस्थित औषध चाचणी प्रयोगशाळेतील सरकारी विश्लेषकाच्या चाचणी अहवालानुसार, सिरपमध्ये ४८.६ टक्के डायथिलीन ग्लायकॉल, एक विषारी औद्योगिक रसायन आढळल्याने ते कमी दर्जाचे घोषित करण्यात आले. या कंपनीच्या सर्व औषधांवर तात्पुरती बंदी घालण्यात आली आहे.

# रोज सकाळी दोन रुपयांच्या कढीपत्त्याची पाने चावून खा, शरीराला मिळतील हे अविश्वसनीय फायदे

कढीपत्ता आपल्या स्वयंपाकघरातील एक अतिशय सामान्य पण उपयोगी घटक आहे. याचा वापर जेवणाला सुगंध आणि चव देण्यासाठी केला जातो. मात्र तुम्हाला माहीत आहे का, की हा छोटासा पत्ता आपल्या आरोग्यासाठीही अत्यंत फायदेशीर ठरू शकतो? होय, कढीपत्त्यामध्ये अनेक औषधी गुणधर्म असतात जे शरीरासाठी उपयुक्त आहेत. चला जाणून घेऊया – रोज सकाळी रिकाम्या पोटी कढीपत्ता खाल्ल्याचे काही महत्त्वाचे फायदे.

१. पचनसंस्था मजबूत बनवतो सकाळी रिकाम्या पोटी ४–५ कढीपत्ते चावून खाल्ल्यास पचनक्रिया सुधारते. यात असलेले फायबर आणि एन्झाइम्स पोटातील पाचक रसांची निर्मिती वाढवतात, ज्यामुळे अन्नाचे पचन योग्य रीतीने होते. त्यामुळे बद्धकोष्ठता, गॅस आणि आम्लपित्तासारख्या समस्या कमी होतात आणि आतड्यांचे आरोग्य सुधारते.

२. वजन कमी करण्यात मदत कढीपत्त्यामध्ये असलेले फायबर जास्त वेळ पोट भरल्यासारखे वाटण्यास मदत करते, ज्यामुळे वारंवार खाण्याची सवय कमी होते. तसेच, हे शरीरातील मेटाबॉलिझम वाढवते आणि चरबी साचू देत नाही. त्यामुळे वजन कमी करण्याच्या प्रक्रियेत हा एक नैसर्गिक मदतनीस ठरतो.

३. डायबिटीज नियंत्रणात ठेवतो कढीपत्त्याचे अँटी–हायपरग्लायसेमिक गुणधर्म रक्तातील साखरेचे प्रमाण संतुलित ठेवण्यास मदत करतात. हे इंसुलिनची कार्यक्षमता वाढवतात, ज्यामुळे ब्लड शुगर लेव्हल नियंत्रित राहते. रोज सकाळी रिकाम्या पोटी कढीपत्ता खाल्ल्याने मधुमेहावर नियंत्रण ठेवता येते.

४. कोलेस्ट्रॉल कमी करतो कढीपत्त्यामधील अँटीऑक्सिडंट्स शरीरातील वाईट कोलेस्ट्रॉल (LDL) कमी करण्यास मदत करतात आणि हृदयाच्या धमन्यांमध्ये प्लाक साचू देत नाहीत.

# बालरंगभूमी परिषदेतर्फे बालकलावंत करणार जल्लोष लोककलेचा

लातूर (प्रतिनिधी) – राज्यातील बालकलावंतांच्या सर्वांगिण विकासासाठी सातत्याने नवनवीन उपक्रम राबविणा–या बालरंगभूमी परिषदेच्या लातूर शाखेतर्फे जल्लोष लोककलेचा या महोत्सवाचे आयोजन दि. १५ व १६ नोव्हेंबर रोजी करण्यात येणार आहे.

महाराष्ट्राची कला व परंपरा जपताना बालमनावर संस्कार करण्याच्या अनुषंगाने बालकांसाठी लोककला महोत्सवाचे आयोजन बालरंगभूमी परिषदेकडून करण्यात येत असते. लोककलांचा प्रगल्भ वसा लाभलेल्या आपल्या महाराष्ट्रात लोककलांना उर्जितावस्था प्राप्त व्हावी व केवळ मनोरंजनात्मक स्वरुप न राहता बालकलांची महती बालकांपर्यंत पोहचन गायन, वादन, नृत्य क्षेत्रात त्यांनी कौशल्य प्राप्त करावे, यासाठी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवात समूह लोकनृत्य व समूह लोकगीत गायनासोबतच एकल लोकनृत्य, लोकगीत गायन व लोकवाद्य वादनाचे स्पर्धात्मक आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात सहभागी होणा–या सर्व बालकलावंतांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. यासोबतच समूह लोकनृत्य व समूह लोकगीत करिता सर्वोत्कृष्ट रु.४०००, सन्मानिचन्ह व प्रमाणपत्र, उत्कृष्ट रु.३०००, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, उत्तम रु.२००० सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, २ प्रशंसनीय रु.१०००, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, एकल लोकगीत गायन, लोकनृत्य, लोकवाद्यवादन याकरिता सर्वोत्कृष्ट रु.२०००, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, उत्कृष्ट रु.१५००, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, उत्तम रु.१००० सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, २ प्रशंसनीय रु.५००, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत.

जास्तीतजास्त बालकलावंतांनी या महोत्सवात सहभागी होऊन लोककलेचा जल्लोष करावा, अधिक माहितीसाठी रणजित आचार्य ८४४६८६५९०८, मयूर राजापूरे रंगभूमी फॅन्सी ड्रेसेस यशोदा टॉकीज जवळ ९९७०६०२९९०, नवलाजी जाधव निश्चय संस्कृत क्लासेस ट्युशन एरिया लातूर ७२७६६६२६२७, रवी अघाव ७०२०३४२६७२, रविकिरण सावंत ७०२०३६२१८५ यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन बालरंगभूमी परिषद लातूर शाखेतर्फे करण्यात आले आहे.

# 'वंदे मातरम' गीताचे लातूर येथे सामूहिक गायन; नागरिक, विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभाग








लातूर :- कवी बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी १८७५ साली लिहिलेले 'वंदे मातरम्' या गीतास आज दीडशे वर्षे पूर्ण झाली, ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्ट्या या महत्वाच्या घटनेनिमित्त लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे या गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थी व नागरिकांनी उस्फुर्त सहभाग नोंदविला. तसेच यानिमित्ताने तयार करण्यात आलेली विशेष लघुनाटिका सादर करण्यात आली. आमदार विक्रम काळे, अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, कौशल्य विकास व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी, शिक्षण महर्षी वसंतराव काळे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य एस. व्ही. माळकुंजे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी पी. जे. औताडे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वंदे मातरम् गीताला दीडशे वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त संपूर्ण देशभरात सकाळी ९.५० वाजता एकाच वेळी या गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे झालेल्या जिल्हास्तरीय कार्यक्रमात आमदार श्री. काळे यांनी आपल्या मनोगतात 'वंदे मातरम्' हे गीत प्रेरणादायी असल्याचे सांगितले. अपर जिल्हाधिकारी श्रीमती करमरकर, प्रा. परमेश्वर हासबे यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. राज्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये 'वंदे मातरम्' गीतगायन, देशभक्तिपर भाषणे, वक्तृत्व स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामधील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

## तुमचं तुम्हाला तरी पटतंय का हे बोलताना? उबाठाच्या नेत्याचा अजित पवारांना सवाल, केली 'ही' मोठी मागणी

पुण्यातील जमीन घोटाळा प्रकरणामुळे अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या अडचणी वाढल्या असल्याचे चित्र दिसत आहे. १८०० कोटी रुपयांचे बाजारभाव असलेली जमीन ३०० कोटी रुपयांना खरेदी करून यासाठी केवळ ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क भरण्यात आले, असा आरोप होत आहे.

जमीन घोटाळाप्रकरणावरून पार्थ पवार यांच्यावर आरोपांची राळ उठवली जात आहे. या प्रकरणाची गंभीर दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली असून, चौकशीचे आदेश दिले आहेत. बावधन पोलिसांनी या प्रकरणी तीन जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दिग्विजय पाटील, शितल तेजवानी आणि रवींद्र तारू यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. मुद्रांक विभागाला सात दिवसांत अहवाल सादर करण्यास सांगितले आहे.

उबाठाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी पार्थ पवार यांची सही असलेला एक कागदपत्राचा फोटो फेसबुक पोस्ट करून शेअर करत पार्थ पवार यांच्यावर गुन्हा दाखल होण्यापासून वाचवण्याचा मुंद्रांक विभाग आणि पोलिस प्रयत्न करत आहेत का? असा सवाल उपस्थित केला आहे. या प्रकरणावरून उबाठा गटाच्या नेते अंबादास दानवे यांनी अजित पवार यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.



पार्थ पवार यांच्यावर आरोप झाल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना माझ्याशी दुरान्वये संबंध नाही असे ते म्हणाले होते. त्यांनी दिलेल्या प्रतिक्रियेवर अंबादास दानवे यांनी तुमचं तुम्हाला तरी पटतंय का हे बोलताना? असा सवाल केला आहे.

मुलगा पुण्यात ३०० कोटींचा व्यवहार करतो, हे पित्याला ज्ञात नाही. आणि जेव्हा या मुलाचे वडील पुण्याचे पालकमंत्री आहेत. तुमचं तुम्हाला तरी पटतंय का हे बोलताना? बाजार भावापेक्षा कमी दरात जमीन घेतली गेली आहे, खडसेंचा राजीनामा घेतला गेला होता. चौकशी होईपर्यंत नैतिकता राखून तुम्हीही राजीनामा द्या

अजित पवारांची प्रतिक्रिया तीन ते चार महिन्यांपूर्वी अशा पद्धतीचं काहीतरी सुरु असल्याचं माझ्या कानावर आलं होतं. तेव्हा मी असलं काही चुकीचं केलेलं मला चालणार नाही असं सांगितलं होतं. कोणत्याही चुकीच्या गोष्टी कोणीही करु नयेत अशा स्पष्ट सूचना मी दिल्या होत्या. त्यानंतर परत काय झालं मला माहिती नाही. आता वेगवेगळ्या जमिनीबद्दल बरंच काही सांगितलं जातं. त्याची इत्यंभूत माहिती घेणार आहे की कोणती कागदपत्रं आहेत कोणती नाही, कोणी परवानगी दिली, कोणी नाही, अशी प्रतिक्रिया अजित पवार यांनी दिली आहे.

## हा घोटाळा खरा असेल तर; आदित्य ठाकरेंनी उपस्थित केला 'तो' सवाल, म्हणाले भाजपच्या मित्रपक्षांना आता



पुण्यातील जमीन गैरव्यवहार प्रकरणामुळे पार्थ पवार आरोपांच्या चक्रव्यूहात सापडलेले आहेत. पार्थ पवार यांच्याशी संबंधित पुणे शहरातील मुंढवा परिसरात ४० एकर जमिनीशी संबंधित प्रकरण सध्या राज्यात गाजत आहे. विरोधकांनी या प्रकरणावरून पार्थ पवार यांना लक्ष्य करत महायुती सरकावर हल्लाबोल केला आहे.या प्रकरणामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. विरोधकांच्या संतप्त प्रतिक्रिया देखील समोर येत आहेत. या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौकशी समिती स्थापन करण्याचे आदेश दिले असून, तीन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झालेल्यांमध्ये पार्थ पवार यांच्या मामेभावाचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. अशातच या प्रकरणी आमदार आदित्य ठाकरे यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. या प्रकरणात दोन गोष्टी आहेत. एक मी ऐकले की, यामध्ये कोणत्यातरी रजिस्ट्रारला निलंबित करण्यात आले आहे. जर ऐवढी मोठी गोष्ट असेल, हा घोटाळा खरा असेल तर या एका निलंबनाने हा विषय संपणार आहे का? असा सवाल विचारत आणि दुसरी गोष्ट अशी की, भाजपाच्या मित्रपक्षांना आता कळले असेल की, ते जवळ तर घेतात पण बदनाम करून सोडतात. अशी खोचक प्रतक्रिया त्यांनी दिली आहे.

प्रकरण काय? पुण्यातील महार वतनाची ४० एकर जमीन अमेडिया या कंपनीने १८०० कोटींची बाजारभाव असताना ३०० कोटी रुपयांत खरेदी केल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे या कंपनीचे संचालक पार्थ पवार आहेत. या कंपनीत दिग्विजय पाटील नावाच्या व्यक्तीचीही भागीदार आहे. या व्यवहारासाठी केवळ ५०० रुपयांचा मुद्रांक शुल्क भरण्यात आल्याचा आरोप होत आहे. विरोधकांनी या प्रकरणावरून आरोपांची राळ उठवली असून, पार्थ पवार अडचणीत सापडल्याचे बोलले जात आहे.

## रेवंत रेड्डी यांच्या मुस्लिमांबद्दलच्या 'त्या' विधानावर भाजपची टीका ; व्होट बँकेचे राजकारण केल्याचा आरोप

तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांच्या मुल्सिमनबद्दल केलेल्या विधानावरून राज्यात गोंधळ निर्माण झाला आहे. राज्याचे भाजपचे अध्यक्ष एन. रामचंद्र राव यांनी रेवंत रेड्डी यांच्यावर व्होट बँकेचे राजकारण केल्याचा आरोप केला आहे. काँग्रेस म्हणजे मुस्लिम आणि मुस्लिम म्हणजे काँग्रेस असे रेड्डी म्हणाले होते. त्यांच्या याच विधानावर रामचंद्र राव यांनी, काँग्रेसच्या राजवटीत सर्वाधिक जातीय दंगली झाल्या. मग काँग्रेस म्हणजे मुस्लिम असे कसे म्हणता येईल? असा सवाल केला. तसेच मुख्यमंत्री पोटनिवडणूकहरणार असल्याने हताश आहेत, म्हणून त्यांना फक्त मुस्लिम मते हवी आहेत आणि हिंदू मतांचा विचार करत नाहीत.असे म्हणत त्यांनी ए. रेवंत रेड्डी यांच्यावर टीका केली आहे. यापूर्वी, केंद्रीय कोळसा मंत्री जी. किशन रेड्डी यांनी तेलंगणा मंत्रिमंडळात माजी क्रिकेटपटू मोहम्मद अझरुद्दीन यांच्या अलिकडेच समावेशाला विरोध केला होता. मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी एका निवडणूक रॅलीत किशन रेड्डींवर टीका केली. रेवंत रेड्डी म्हणाले, काँग्रेस सरकारने अल्पसंख्याकांना अनेक संधी दिल्या आहेत. फक्त काँग्रेसनेच अल्पसंख्याकांना उच्च पदे दिली आहेत. काँग्रेस म्हणजे मुस्लिम आणि मुस्लिम म्हणजे काँग्रेस. आदल्या दिवशी एन. रामचंद्र राव यांनी पीटीआय-व्हिडिओला सांगितले की, जुबली हिल्स विधानसभा मतदारसंघात ११ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या पोटनिवडणुकीत मुस्लिम मते मिळवण्यासाठी



रेड्डी मुस्लिम तुष्टीकरणात गुंतले आहेत. राज्य भाजप अध्यक्ष म्हणाले की, निवडणूक प्रचारादरम्यान टोपी घालून, रेवंत रेड्डी २० टक्के मुस्लिम मते मिळवण्यासाठी रेवंत उद्दीन बनले आहेत. ते म्हणाले, हे स्पष्ट आहे की त्यांची (रेड्डींची) विधाने व्होट बँकेच्या राजकारणाचा भाग आहेत. ते म्हणतात की काँग्रेसमुळे मुस्लिमांना आदर मिळतो. काँग्रेसने मुस्लिमांचा आदर केला नाही. खरं तर, काँग्रेस मुस्लिमांचा व्होट बँक म्हणून वापर करून त्यांचा सन्मान दुखावत आहे. खरा प्रश्न हा आहे की काँग्रेस मुस्लिमांना शिक्षण, आरोग्य सुविधा, रोजगार आणि घरे देत आहे की नाही. एन. रामचंद्र राव यांनी आरोप केला की भारत राष्ट्र समिती (बीआरएस) समान धोरणे स्वीकारत आहे आणि दोन्ही पक्ष २० टक्के मुस्लिम मतांसाठी ८० टक्के हिंदू लोकसंख्येकडे दुर्लक्ष करत आहेत.

## कोकणातून मोठी बातमी समोर; स्थानिक निवडणुकीसाठी दोन्ही शिवसेना एकत्र येणार? 'त्या' बैठकीनंतर चर्चांना उधाण

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. २ डिसेंबरला पहिल्या टप्प्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायतीसाठी मतदान पार पडणार असून, ३ डिसेंबरला निकाल जाहीर होणार आहे. तर १० नोव्हेंबरपासून निवडणुकीची प्रक्रियेला सुरूवात होणार आहे. यामुळे निवडणुकीचे बिगुल वाजल्यानंतर राज्यातील सर्वच राजकीय पक्षांच्या गोठ्यात हालचालींना वेग आला आहे. महायुती आणि महाविकास आघाडीतील घटक पक्षांना आपल्या जास्तीत जास्त उमेदवारांना निवडून आणण्याचा प्रयत्न असणार आहे. त्यामुळे जागावाटपात रस्सीखेच अटळ आहे. एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर दोन शिवसेना अस्तित्वात आल्या. त्यामुळे कोकणातून एक मोठी बातमी समोर आली असून, स्थानिक निवडणुकांसाठी दोन्ही शिवसेना एकत्र येणार असल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

कोकणात मोठी राजकीय उलथापालथ होणार असल्याची जोरदार चर्चा स्थानिक राजकारणात होत आहे. ठाकरेंची शिवसेना आणि शिंदेंची शिवसेना कोकणामध्ये एकत्र निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. यासंदर्भात दोन्ही पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची कणकवलीत एकत्रित महत्वाची बैठक पार पडली.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नगरपरिषद आणि नगरपंचातासाठी राजकीय



मैदान तापू लागले आहे. हालचालींना वेग प्राप्त झाला असून भाजपने स्वबळाचा नारा दिला आहे. यामुळे शिवसेनेने आपली ताकद वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. जर दोन्ही शिवसेनेची युती झालीच तर एक वेगळ चित्र पाहायला मिळेल. कणकवली शहर विकास आघाडीच्या वतीने उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना एकत्रित निवडणुकीला सामोरे जावू शकतात. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून नगराध्यक्ष पदासाठी संदेश पारकर यांच्या नावाची चर्चा आहे. त्यांच्या नावाला शिंदे सेना पाठिंबा देणार असल्याची माहिती समोर आली आहे. ही जर प्रत्यक्षात गोष्ट आली तर ही नवी राजकीय नांदी असणार आहे.

## मनोज जरांगेंचा गौप्यस्फोट; हत्येच्या कटाबाबत धनंजय मुंडे यांचं थेट नाव घेत गंभीर आरोप

मराठा आरक्षणासाठी आंदोलनाचे हत्यार उपसणारे मनोज जरांगे यांच्या हत्येच्या कट रचल्याच्या बातमीने एकच खळबळ उडाली असून, या प्रकरणाची गंभीर दखल जालना पोलिसांनी घेतली असून पोलिस तपासात दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे. या प्रकरणात एका बड्या नेत्याचा हात असल्याचा आरोप करण्यात आला होता. आज या प्रकरणी मनोज जरांगे यांनी पत्रकार परिषदेत धक्कादायक माहिती देत मोठा दावा केला आहे. यामुळे राजकीय विश्वात मोठी खळबळ उडाली आहे. जरांगे यांच्या हत्येचा कटासाठी अडीच कोटी रुपयांची कॉन्ट्रॅक्ट किलिंगची ऑफर देण्यात आल्याचे समोर आले होते. या प्रकरणात मनोज जरांगे यांनी माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी हा कट रचल्याचा गंभीर आरोप केला आहे. काय म्हणाले मनोज जरांगे ? बीडच्या मोठ्या नेत्याच्या पीए की कार्यकर्ते



यांनी मिळून हत्येचा कट रचला. त्यामागे धनंजय मुंडे होते, असा अत्यंत गंभीर आरोप मनोज जरांगे यांनी केला आहे. त्यांनी भेट घेत कसा मारायचं याचा प्लॅन केला. गाडीने गाडी धडकून मारू, असा प्लॅन झाला. त्यासाठी परराज्यातील पासिंग असलेली गाडी देण्याची तयारी धनंजय मुंडे यांनी दाखवली, असेही जरांगे यांनी सांगितले. बीडचा एका मोठ्या नेत्याची पीए की कार्यकर्ता तो आरोपींकडे गेला. येथून घटनाक्रम सुरू झाला, अशी धक्कादायक माहिती मनोज जरांगे यांनी दिली. कांचन नावाचा माणून धनंजय मुंडेचा पीए आहे. तो आरोपांनी धनंजय मुंडे यांच्याकडे घेऊन गेला, असेही त्यांनी सांगितले. तसेच या प्रकरणी माहिती देताना मनोज जरांगे म्हणाले, धनंजय मुंडे आरोपींची संभाजीनगरच्या एका फाट्यावर एक तास वाट पाहत होते. खरं खोट तपास करा आम्हाला मिळालेल्या माहितीवर आम्ही सांगत आहे. हा कट रचनारा मुख्य सुत्रधारच धनंजय मुंडे आहे. मनोज जरांगे यांनी केलेल्या दाव्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. आता या आरोपांवर धनंजय मुंडे काय प्रतिक्रिया देतात हे पाहणे महत्वाचे असणार आहे.

## मतदानाच्या वाढत्या टक्क्याचे कारण काय? ; प्रशांत किशोर यांनी दिली 'ही' महत्वाची माहिती

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात आजपर्यंतचे सर्वाधिक (२०२५) ६४.६६ टक्के मतदान झाले. मतदानात लोकांनी इतिहास रचला आहे असे मानले जाते. सर्वात मोठा प्रश्न म्हणजे इतक्या वर्षांनंतर असे काय झाले के एवढे मतदान झाले आहे? निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी यावर महत्वाची माहिती दिली आहे. त्यांनी आज बिहारमधील गयाजी याठिकाणी पत्रकारांना दिलेल्या मुलाखतीत या विषयावर विस्तृतपणे भाष्य केले. प्रशांत किशोर यांनी याविषयी माहिती देताना, १४ तारखेला इतिहास लिहिला जाईल. जनता एका नवीन पर्यायाबद्दल उत्सुक आहेअसे म्हटले. त्यांनी स्थलांतरित कामगारांना या निवडणुकीत एक्स-फॅक्टर म्हणून वर्णन केले. स्वातंत्र्यानंतर सर्वाधिक मतदान हे दर्शविते की गेल्या ३० वर्षांपासून राजकीय पर्यायांचा अभाव असल्याने उदासीनता निर्माण झाली होती. जन सूरजच्या आगमनाने एक पर्याय उपलब्ध करून दिला आहे. नवीन पर्यायामुळे मतदान झाले. बदलासाठी मतदान झाले. छठ नंतर मागे राहिलेल्या स्थलांतरित कामगारांनी मतदान करून सर्वांना आश्चर्यचकित केले. २ कोटींहून अधिक लोकांचे मतदान प्रशांत किशोर म्हणाले की, स्थलांतरित कामगारांची संख्या महिलांपेक्षा जास्त आहे.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं.१०, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर-४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास खडक हनुमान मंदिर मिलिंद नगर लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.